# गरीबी आणि रोगराई

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

जागतिक आरोग्य संघटनेने एक फेब्रुवारीला झिका (zika) नावाच्या व्हायरसाचा प्रसार ही जागतिक आणीबाणी आहे असे अधिकृतरीत्या जाहीर केले. याने होणारा विकार डेंग्यू, चिकनगुन्या यांच्या मालिकेतील आहे. अलीकडच्या काळातील इबोलापेक्षा हा विकार अधिक प्रसृत होण्याची शक्यता आहे. हा व्हायरस डासांमार्फत माणसांपर्यंत येतो. सध्या त्याचा प्रादुर्भाव मध्य आणि दक्षिण अमेरिका खंडात असला तरी जेथे डास वाढतात अशा हवामानाच्या प्रदेशात, म्हणजे भारतासारख्या उष्ण, दमट प्रदेशात तो संभाव्य धोका आहे. हा व्हायरस नवीन नाही. तो गेली सत्तर वर्षे तरी अस्तित्वात आहे. असे व्हायरस वर्षानुवर्षे सुप्त राहू शकतात.पण त्याने होणाऱ्या विकारांची साथ पसरली की मग सरकारे, वैद्यक-शास्त्र जागे होतात.

या व्हायरसाने होणाऱ्या व्याधीवर इलाज नाही. याची लागण झालेल्या स्त्रियांना होणाऱ्या मुलांची डोकी अगदी लहान असतात व त्यांच्या मेंदूची वाढही खुंटलेली असते. आता यातील एखादे मूल नॉर्मल वाटले तरी उत्तरायुष्यात त्याला गंभीर विकार होऊ शकतात, असे आताचे विज्ञान म्हणते. असा व्हायरस लागलेल्या व्यक्तीशी स्त्रीचा संबंध आला तर तिलाही ती लागण होते व पुढची प्रजा दोषी जन्माला येते. अशी साडेचार हजारहून जास्त मुले गेल्या काही महिन्यात ब्राझीलमध्ये जन्माला आली. त्याआधी दर-वर्षी १५० अशी मुले जन्मत असत. हा आकडा अचानक वाढल्याने त्याचे कारण आईला झालेल्या झिकाच्या बाधेत असावे असा संशय आला. अजून हा कार्य-कारण भाव सिद्ध झालेला नाही पण या खंडातील स्त्रियांनी गर्भार रहाणे पुढे ढकलावे, या प्रदेशातून आलेल्या व्यक्तींशी उर्वरित जगातील व्यक्तींनी शरीर-संबंध ठेवू नयेत, तसेच इतर देशातून तेथे जाणे टाळावे असे इशारे देण्यात आले आहेत. इतर परिणाम म्हणजे झिकामुळे सुरुवात होऊन नंतर जीवघेणे गुंतागुंतीचे विकार होवू शकतात, त्यात स्नायू निकामी होणे, अर्धांग निकामी होणे, वगैरे. (हा दावाही सिद्ध झालेला नाही, पण तशी शक्यता आहे असे सध्याचे गृहीत आहे.) या आधीच्या इबोला साथीसारखाच त्याचा संसर्ग मर्यादित करणे एवढेच आजमितीला शक्य आहे. कारण त्यावर औषध नाही व तशी लस यायला पुढचे वर्ष उजाडेल.

इबोला प्रामुख्याने आफ्रिकेत होता. त्यावेळी जागतिक आरोग्य संघटनेकडून त्याची दखल घेण्यात व म्हणून पश्चिमेने हालचाल सुरु करण्यात दिरंगाई केली. ही वेळ परत येऊ नये म्हणून आता त्वरित कारवाई सुरू झाली आहे. शिवाय, झिका अमेरिका देशाच्या दक्षिण सीमेवरील देशांमध्ये बळावतो आहे. ती साथ अमेरिकेत येवू शकते, त्यामुळे तेथे वैद्यकीय संशोधनही प्राधान्यक्रमावर आहे.

आज हा फक्त वैद्यकीय प्रश्न नाही. त्याला अनेक सांस्कृतिक, आर्थिक व धार्मिक बाजू आहेत. तो स्त्री-स्वातंत्र्याशीही निगडित आहे. ते पुढे पाहू.

प्रथम याचा विस्तार पाहता या संसर्गाने ब्राझील देशातच सुमारे १५ लाख लोक व्याधीग्रस्त असावेत. त्याखालोखाल इतर देशात. दक्षिण अमेरिका खंडातील २७ देशात याचे रुग्ण आजवर आढळले आहेत. कोलंबिया देशात पहिले बळी फेब्रुवारीमध्ये पडल्याची बातमी आहे. येथून जगभर हा संसर्ग पोचू शकेल; म्हणून आणीबाणी.

या विकारांचे बळी पहाता आर्थिक वर्ग, शहरी-ग्रामीण भागातील धर्माचा प्रभाव व भेद, वर्ण हे उघडपणे झिकाचा विस्तार दाखवतात. साध्या शब्दांत संपन्न वस्तीत डासांचा प्रादुर्भाव कमी असतो. डास वाढतात ते झोपडपटटीत, सांडपाण्याचा निचरा न होणाऱ्या शहरी भागात आणि खेड्यात - जेथे साठलेल्या पाण्याची डबकी असतात.

द. अमेरिकेतील शहरातल्या अशा वस्तीत आपल्याकडच्या सारखाच रोजी मोलमजुरी करणारा वर्ग - घरकाम करणाऱ्या स्त्रिया, वगैरे राहतो. वैद्यकीय सेवा तिथपर्यंत पोचत नाहीत. तेथील सार्वजनिक स्वच्छता सरकारच्या (व लोकांच्या) प्राधान्यावर नसते. विशेषत: ब्राझीलमध्ये गोरे संपन्न शहरी वस्तीत रहातात तर या वस्त्यांमध्ये प्रामुख्याने आर्थिक कमकुवत कृष्णवर्णीय, मिश्रवर्णीय रहातात.

इथे धर्माचा पगडाही जास्त असतो. एकूणच दक्षिण अमेरिका खंडात कॅथोलिक ख्रिश्चन धर्माचा प्रभाव खूप आहे. चालीरीती, धर्माला मान्य काय, निषिद्ध काय, स्त्रियांचे वर्तन या गोष्टींवर (इतर धर्मांप्रमाणेच) जाचक बंधने आहेत.त्याचा भाग म्हणून कॅथोलिक धर्म गर्भपाताला मंजुरी देत नाही, गर्भनिरोधक वापरून शरीर-संबध ठेवायलाही धर्माची संमती नाही. त्यात गर्भ-निरोधकेही या वस्त्यात पुरेशी व स्वस्त उपलब्ध नसतात, गर्भ-परीक्षेच्या सोनोग्राफीसारख्या सुविधाही उपलब्ध नसतात. वस्तुत:

गर्भ २४ आठवड्यांचा झाल्यावर सोनोग्राफीने त्याची वाढ कळते -झिकाच्या संदर्भात डोके अपुरे वाढले आहे, हे कळू शकते.असे मूल जन्माला येणे स्त्रीला किंवा त्या कुटुंबाला हवे असेलच असे नाही - किंबहुना गर्भपात हा त्यांचा कल असतो. पण धर्म नेमका हा पर्याय स्त्रीला नाकारतो. त्याचे दोन अनिष्ट परिणाम होतात - असे मूल जन्माला आल्यास नवऱ्याने बायकोला सोडून देण्याच्या घटना घडलेल्या आहेत. दुसरा म्हणजे, छुप्या वैदू/अशिक्षित सुईणीकडून आरोग्यदृष्ट्या असुरक्षित वातावरणात अगतिकतेने स्त्री महागडा गर्भपात करून घेते. (महागडा, कारण हे अवैध व्यवसाय उघडकीस आले तर सरकार ते कधीही बंद पाडू शकते - ती शक्यता लक्षात ठेवून व स्त्रीच्या अगतिकतेचा फायदा घेवून उपचाराची किंमत वाढते.) त्यात अर्थातच ती दगावण्याचीही शक्यता असते.

मध्यंतरी आयर्लंडसारख्या विकसित कॅथोलिक ख्रिश्चन देशात अत्याधुनिक इस्पितळात एक भारतीय महिला दाखल झाली. तिचा गर्भ तिच्याच जीवाला धोका देणार हे वैद्यकीयदृष्ट्या स्पष्ट दिसत होते. पण, गर्भपात करण्यास धार्मिक कारणावरून उच्चशिक्षित डॉक्टर्सनी, सर्व सुविधा असताना नकार दिला. तीन दिवस तो विषारी गर्भ बाळगून, अनंत यातना भोगून त्या स्त्रीचा मृत्यू झाला. यावरून धर्माचा प्रभाव लक्षात यावा.

दक्षिण अमेरिका तर त्यामानाने अविकसित प्रदेश आहे.बऱ्याच देशात बलात्कार झाला व गर्भ राहिला तरी गर्भपात बेकायदेशीर आहे.(आधीच्या एका 'आंदोलन'मध्ये याचा सविस्तर आढावा घेतलेला आहे.) काही ठिकाणी आईच्या जीवाला धोका असेल तरच गर्भपात कायदेशीर आहे. (हा धोका वैद्यक नाही, चर्च ठरवते! त्यात झिका-जन्य विकार येत नाहीत). ब्राझीलमध्ये कॅथोलिक चर्चच्या दबावाखाली आता गर्भपाताला मदत करणे हा गुन्हा ठरवण्याचा कायदा येऊ घातला आहे.त्याचे समर्थक म्हणतात की गर्भपात केला तर ती अपराधी भावना आईला आयुष्यभर रहाते, ते नको. या परिस्थितीत बेकायदेशीर गर्भपात वाढतात. तशा गर्भपातातून झालेल्या आरोग्याच्या गुंतागुतींवर उपचार करून घेण्यासाठी मागील वर्षी दीड लाख महिला इस्पितळात आल्या, तर बेकायदेशीर गर्भपात करून घेणाऱ्यांची संख्या साडे-आठ लाख असावी. वर म्हटल्याप्रमाणे कुटुंब-नियोजनही धर्माला अमान्य आहे. त्यामुळे 'गर्भार रहाणे पुढे ढकला' या आदेशाला अर्थ रहात नाही.

त्यात एक गुंतागुंत अशी की हे डास फक्त दिवसाच चावतात, रात्री नाहे. त्यामुळे मचछरदाणीचा उपयोग होत नाही. दुसऱ्या शब्दांत शेतकाम, बांधकाम यासारख्या उघड्यावर काम करणाऱ्या स्त्रियांना अधिक धोका असतो. कामाच्या स्वरूपामुळे त्या डासांपासून वाचण्यासाठी संपूर्ण अंग झाकणारे कपडेही घालू शकत नाहीत.

म्हणजे डासांचे निर्मूलन हा एकच पर्याय आहे. त्यासाठी पूर्वी डीडीटीचे फवारे सरकार अशा भागात मारत असे. पण त्यामुळे डासांबरोबर इतरही जीव मारले जातात आणि ते फवारे पर्यावरणाला हानिकारक आहेत. हे लक्षात आल्यावर आता इतर उपाय करण्यात येत आहेत उदा. लष्करी मदतीने साचलेली पाण्याची डबकी नष्ट करणे. एक नवीन उपाय म्हणजे genetically modified नपुंसक डास अशा वस्त्यांवर सोडणे. चावतात व रोग फैलावतात त्या माद्या, नर नाही. या नपुंसक डासांचा झिका असणाऱ्या माद्यांशी संबध आला की होणारी संतती जन्मत:च मरते. पण हे अजून प्रायोगिक प्रमाणात आहे. यामुळे संपूर्ण नायनाट नाही पण रोग फैलावू शकेल त्या संख्येपेक्षा कमी डास जन्माला येतात असा जी कंपनी हे तंत्र बनवते, तिचा दावा आहे.त्यांच्या मते ८०% झिका पसरवू शकणारे डास मरतात. हा उपाय काय किंवा औषध कंपन्यांचा नवीन औषध शोधण्याचा प्रयत्न काय - दोन्हीवर (इबोलाच्या वेळी झाला होता तसा) हा कट आहे असा आरोप होत आहे - अचानक व्हायरस येतो, आणि मग सरकारे औषध कंपन्या मागतील त्या किमतीला त्यांची औषधे विकत घेतात, मुळात हा व्हायरसही औषध-कंपन्यांनी निर्माण केला आहे कारण झिकाने प्रत्यक्ष मृत्यू झाल्याचा पुरावा नाही - असा हा कट!

१९३० च्या दशकात एका डॉक्टरने दक्षिण अमेरिकेचा मोठा भाग डास-मुक्त केला होता.सरकारी मदतीने इन्स्पेक्टर सरळ घरात घुसत असत आणि साठलेले पाणी नष्ट करत. तेव्हा बहुतेक दक्षिण अमेरिकेत हुकूमशाही होत्या. त्यामुळे हे निर्मूलन शक्य झाले असा त्याचा दावा. लोकशाहीत डासांचा नाश शक्य नाही असे त्याचे म्हणणे! (बाकी कोणत्याही प्राण्या-कीटकापेक्षा मलेरियापासून जीवघेणे रोग लावणारा डास हा सगळ्यात भयानक कीटक आहे.)

ब्राझीलच्याबाबत दुसरी अडचण अशी की ऑलिंपिक खेळ या वर्षी राजधानीत होणार आहेत. ते तोंडावर आले आहेत. झिकाचा प्रसार त्याच भागात आहे. केनिया देशाने आताच त्या भीतीने आमचा संघ तेथे खेळणार नाही असे जाहीर केले आहे. हा फैलाव कितपत आणि कधीपर्यंत आटोक्यात येतो यावर इतर देशांची प्रतिक्रिया लवकरच दिसेल. (ब्राझिलसारख्या गरीब देशाने ऑलिंपिक भरवण्याची महागडी हौस करावी का हा निराळा मुद्दा.)

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*